लोकमत

## शिवाजी विद्यापीठात मेळावा : सुमारे ३०० जणांची उपस्थिती; उत्स्फूर्त प्रतिसाद

# दिव्यांग विद्यार्थ्यांनी गिरविले कौशल्याचे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मुलाखततंत्र, छायाचित्रण, माहिती व तंत्रज्ञान, अशा कौशल्यांचे धडे शिवाजी विद्यापीठात कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील दिव्यांग विद्यार्थ्यांनी शुक्रवारी गिरविले. रोजगार उपलब्धतेसाठी काही कंपन्यांनी मुलाखती घेतल्या. या मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्ष, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व युजीसी-दिव्यांग व्यक्तींसाठी योजनातर्फे उच्च माध्यमिक, पदवी व पदव्युत्तर दिव्यांगांसाठी कौशल्य व रोजगार मेळावा घेतला. मानव्यशास्त्र इमारतीतील मेळाव्याचे उद्घाटन प्रकुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी उपस्थित होते. समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जी. एस. राशिनकर यांनी स्वागत केले. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठाच्या रोजगार कक्षातर्फे आयोजित कौशल्य व रोजगार मेळाव्यात शुक्रवारी दिव्यांग विद्यार्थिनीने पायाने नोंदणी अर्ज भरला.

### सबलीकरणाचा प्रयत्न

दिव्यांगांप्रती बांधिलकी जपताना विद्यापीठाने केवळ त्यांच्यासाठी कौशल्य व रोजगार मेळावा आयोजित केला आहे. या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त सबलीकरण करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

दरम्यान, मेळाव्यासाठी सुमारे ३०० दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यांना डॉ. गुरव, के. व्ही. मारुलकर, पी. एन. देवाळी, डॉ. राशिनकर, प्रतिभा देसाई, व्ही. एस. खंडागळे, प्रमोद कसबे, महेश चव्हाण, जयंत नागराळे यांनी मार्गदर्शन केले.

दिव्यांग विद्यार्थ्यांना रोजगार, व्यवसायाच्या माध्यमातून स्वत:च्या पायावर उभे राहता यावे, यासाठी मार्गदर्शक ठरणारा मेळावा विद्यापीठाने आयोजित केला.

**- जानकी मोकाशी**, कोल्हापूर

रोजगार व कौशल्य मिळविण्याबाबतचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन या मेळाव्याच्या माध्यमातून विद्यापीठाने उपलब्ध करुन दिले.

**- इंद्रजित सलगर**, तासगाव

या विद्यार्थ्यांसाठी पुढील महिन्यात उद्योग, व्यवसायासाठीची कौशल्ये देण्याच्या अनुषंगाने प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्याचा विचार आहे.

**- डॉ. ए. एम. गुरव**, समन्वयक


Powered by: erelego.com

लोकमत

# विद्यापीठ क्षेत्रात 'स्वच्छ वारी, निर्मल वारी'

## देहू-आळंदी ते पंढरपूर पालखी मार्ग; राष्ट्रीय सेवा योजनेचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) कक्षाद्वारे देहू-आळंदी ते पंढरपूर वारीदरम्यान यावर्षी पर्यावरणपूरक 'स्वच्छ वारी, स्वस्थ वारी, निर्मल वारी, हरीत वारी' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यात एनएसएसचे सुमारे एक हजार स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

या उपक्रमाच्या तयारीबाबत दि. २१ जून रोजी विद्यापीठात प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी, एनएसएसचे डॉ. विठ्ठल बलशेटवार, अतुल साळुंखे, डॉ. डी. के. गायकवाड, आदी उपस्थित होते. या बैठकीत राजेश पांडे यांनी आषाढी पालखी वारी दरम्यान शिवाजी विद्यापीठाद्वारे शासनाकडून निर्धारित पथनाट्याद्वारे एक लाख वारकरी व गावकऱ्यांचे प्रबोधन, ७०० टन ओला कचरा व निर्माल्य संकलन आणि ३५० टन सेंद्रिय खत निर्मिती, ३५ लाख लिटर पाण्याची बचत, आरोग्य शिबिरातून ७० हजार वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड यासाठी एकाच दिवशी एकाच जातीच्या २० हजार रोपांचे वाटप आणि हरित दिंडी, वारीसाठी पालखीच्या मार्गावर वृक्षांची लागवड व संगोपन उद्दिष्टे साध्य करण्याकरिता विशेष प्रयत्न करण्याचे आवाहन केले. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने सातारा जिल्ह्यातील विविध ठिकाणी स्वच्छ वारी, स्वस्थ वारी, निर्मल वारी, हरीत वारी या उपक्रमात प्रतिदिन किमान एक हजार स्वयंसेवकांचे दि. १ ते ७ जुलै या कालावधीत एनएसएसचे विशेष शिबिर आयोजित करण्याचा निर्णय घेतला.

### रोज एक हजार स्वयंसेवकांचा सहभाग

या विशेष शिबिराच्या माध्यमातून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पालखी विश्रांती आणि मुक्काम लोणंद, चांदोबाचा लिंब, तरडगाव, दत्त मंदिर काळज, सुरवडी, निभोरे ओढा, वडजल, विमानतळ फलटण, विडणी, पिंपरद, निंबळक फाटा, बरड, साधुबुवाचा ओढा, धर्मपुरी पाठबंधारे बंगला, शिंगणापूर फाटा, पानसकरवाडी इत्यादी ठिकाणी रोज एक हजार स्वयंसेवक उपस्थित असतील. शिबिरातील सहभागी स्वयंसेवक प्रबोधनपर पथनाट्य, पर्यावरणपूरक पत्रावळ्यांचे वाटप, ओला कचरा व निर्माल्यांचे संकलन, वृक्षारोपण उपक्रमासाठी योगदान देणार आहेत. या उपक्रमाची तयारी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असल्याची माहिती एनएसएसचे प्रा. डॉ. डी. के. गायकवाड यांनी दिली.

# विद्यापीठात मिशन ॲडमिशन सुरू

## पहिल्या फेरीसाठी विद्यार्थ्यांची धांदल

**म. टा. प्रतिनिधी,** कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांसाठी सुरू झालेल्या प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीतील अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांच्या गर्दीने विद्यापीठ कॅम्पस फुलून गेला आहे. १ जुलैपासून प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीला सुरूवात होणार आहे.

गुरूवारी, २७ जूनपासून शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरूवात झाली. पहिल्याच दिवशी अर्ज भरणे, प्रवेश शुल्क भरणे यासाठी विद्यापीठाच्या संबंधित कक्षाबाहेर विद्यार्थ्यांच्या रांगा लागल्या होत्या. यामध्ये एम.एस्सीच्या पहिल्या वर्षासाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी पालकांसमवेत आले होते. तर दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मित्रमैत्रीणीसोबत अर्ज भरण्याला पसंती दिली. वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र या अभ्यासक्रमांसाठी अर्ज भरण्यासाठी



अर्जुन टाकळकर

**प्रवेश शुल्क भरण्यासाठी विद्यापीठात लागलेली रांग**



विद्यार्थ्यांनी गर्दी केली. शुक्रवारीही दिवसभर प्रवेशाची लगबग सुरू होती.

सोमवारी, १ जुलै रोजी शिवाजी विद्यापीठातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. ज्या व्यावसायिक अभ्यासक्रम विभागातर्फे प्रवेश पात्रता परीक्षा घेण्यात आल्या होत्या, त्या परीक्षांच्या निकालानुसार गेल्या आठवड्यात निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे निवड यादी पाहण्यासाठीही विद्यार्थ्यांची विभागात गर्दी होत आहे.

पत्रकारिता व जनसंवाद विभागांतर्गत सुरू असणाऱ्या बी. जे., एम. जे. आणि एम. ए. मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थी आणि पालकांना विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार यांनी यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठ परिसर, शैक्षणिक आणि अन्य सुविधा, अभ्यासक्रम तसेच नियमांची माहिती यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, अनुराधा इनामदार उपस्थित होत्या. दोन जुलै रोजी प्रवेशाची दुसरी, तर पाच जुलै रोजी प्रवेशाची तिसरी आणि अंतिम फेरी आहे.

### पावसातही प्रवेशाची लगबग

गुरूवारपासून पावसानेही हजेरी लावल्यामुळे भर पावसातच विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करत होते. अधिविभागात कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर प्रवेशशुल्क भरण्यासाठी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमधील कक्षात चलन भरण्यासाठी दिवसभर रांग लागली होती. सायंकाळी सहा वाजेपर्यंत विद्यार्थ्यांनी शुल्कासह अर्ज जमा केले. दरम्यान, पदव्युत्तर पदवीच्या दुसऱ्या वर्षातील प्रवेश घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेनंतर ग्रुप सेल्फी काढून आनंद साजरा केला.

# विद्यापीठातर्फे हरित वारीचे आयोजन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

देहू-आळंदी ते पंढरपूर वारीदरम्यान यावर्षीही पर्यावरणपूरक स्वच्छ वारी, स्वस्थ वारी, निर्मल वारी, हरीत वारी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी आळंदी ते पंढरपूरदरम्यान आषाढी पालखी वारी सोहळ्यात शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सातारा जिल्ह्यात विविध ठिकाणी स्वच्छ वारी, स्वस्थ वारी, निर्मल वारी, हरीत वारी या उपक्रमांतील शिवाजी विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहभाग व महत्त्वपूर्ण योगदानास अनुसरून दररोज किमान एक हजार विद्यार्थी स्वयंसेवक-स्वयंसेविकांचा सक्रिय सहभाग राहणार आहे.

यासंदर्भात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली. यावेळी राजेश पांडे, अमित



कुलकर्णी, डॉ. विठ्ठल बलशेटवार, रासेयो राज्य सल्लागार समिती सदस्य तसेच अतुल साळुंखे यांचे व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत नियोजन बैठक झाली.

यावेळी राजेश पांडे म्हणाले, 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आषाढी पालखी वारीदरम्यान शिवाजी विद्यापीठाद्वारे सरकारकडून निर्धारित पथनाट्याद्वारे एक लाख वारकरी व गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाद्वारे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सातारा जिल्ह्यातील विविध ठिकाणी स्वच्छ वारी, स्वस्थ वारी, निर्मल वारी, हरित वारी उपक्रमातील शिवाजी विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहभाग व महत्त्वपूर्ण योगदानास अनुसरून दररोज किमान हजार विद्यार्थी स्वयंसेवक-स्वयंसेविका याप्रमाणे सात दिवसांसाठी किमान सात हजार स्वयंसेवक-स्वयंसेविकांचा सक्रिय सहभाग घेणार आहेत. १ ते ७ जुलै या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर आयोजित केले आहे.'

उपक्रमाच्या आयोजनासाठी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील यांचे प्रयत्न सुरू आहे.

# मेळाव्यातून ८० दिव्यांगांना मिळाला रोजगार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

कुणाच्या डोळ्यापुढे अंधत्वाचा अंधार असला तरी मनात जिद्दीचा प्रकाश होता... हातापायाने अपंग असलेल्यांच्या मनाचे बळ भक्कम होते...मूक व कर्णबधीरांपर्यंत आवाज पोहोचत नसला तरी स्वप्नांचा ध्वनी त्यांच्यासाठी महत्त्वाचा होता. हात नसलेल्यांनी पायाच्या बोटात पेन धरून अर्ज भरत नियतीलाही झुकवले. तर अंध उमेदवारांना अर्ज भरून देणाऱ्या मूकबधीरांनी सहकार्याची नवी परिभाषा दिली. शुक्रवारी शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र विभागाच्या इमारतीमध्ये दिव्यांगासाठी भरवलेल्या रोजगार मेळाव्याच्या निमित्ताने नोकरी व्यवसायाच्या संधीचे आकाश खुले झाले. मोठमोठ्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना मुलाखत देणाऱ्या दिव्यांगांमधील आत्मविश्वास त्यांच्या अपंगत्वालाही हरवून गेला. दरम्यान, ८० दिव्यांग उमेदवारांची विविध आस्थापनांमध्ये निवड झाली.

शिवाजी विद्यापीठाने समावेशी शिक्षण केंद्राच्या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या उपक्रमांची देशपातळीवर 'नॅब'सारख्या संघटनांनी दखल घेऊन पुरस्कार देऊन गौरविले आहे. दिव्यांगांप्रती ही बांधिलकी जपताना विद्यापीठाने केवळ त्यांच्यासाठी कौशल्य व रोजगार मेळावा आयोजित केला आहे. त्याला मिळालेला प्रतिसाद पाहता या पुढील काळातही विद्यापीठ अशा प्रकारचे उपक्रम दिव्यांगासाठी राबवेल, अशी ग्वाही प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी दिली.

अमित गद्रे





हाताने अपंग असलेली विद्यार्थिनी पायात पेन धरून अर्ज भरताना. दुसऱ्या छायाचित्रात चाकाच्या खुर्चीवरून मुलाखतीसाठी आलेले उमेदवार

## नोकरीच्या संधींचे आकाश खुले

शिवाजी विद्यापीठाचे मध्यवर्ती रोजगार कक्ष, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि युजीसी- दिव्यांग व्यक्तींसाठी योजना यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च माध्यमिक, पदवी व पदव्युत्तर दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कौशल्य व रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्याचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. उद्घाटनानंतर नोंदणीकृत दिव्यांग उमेदवारांशी संवाद साधताना प्र-कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते. मेळाव्यासाठी सुमारे तीनशे दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली.

याप्रसंगी मेळाव्याचे समन्वयक डॉ. ए.एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जी.एस. राशिनकर यांनी स्वागत केले तर बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी आभार मानले. यावेळी युजीसी-स्कीम फॉर पर्सन विथ डिसॅबिलीटीज योजनेच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण आदी उपस्थित होते.

मेळाव्यात मूकबधीर, अंध, अस्थिव्यंग अशा २९६ दिव्यांग उमेदवारांनी नोंदणी केली. दिवसभरात युरेका फोर्ब्ज, डॉ. रेड्डीज फाउंडेशन, एल.आय.सी. आदी आस्थापनांनी नोंदणीकृत उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. सहभागींना मुलाखत तंत्र, छायाचित्रण, आयसीटी कौशल्ये, ग्रुप डिस्कशन, सकारात्मक विचार कौशल्ये, रिझ्युम लेखन, टॅक्स प्रॅक्टीस, सेट-नेट व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन अशा विविध कौशल्यांबाबत डॉ. ए.एम. गुरव, डॉ. के.व्ही. मारुलकर, डॉ. पी.एन. देवाळी, डॉ. जी.एस. राशिनकर, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. व्ही.एस. खंडागळे, प्रमोद कसबे, महेश चव्हाण आणि जयंत नागराळे यांनी मार्गदर्शन केले.

### चांगल्या कंपन्यांत संधी

शिवाजी विद्यापीठातर्फे केवळ दिव्यांगांसाठी आयोजित करण्यात आलेल्या रोजगार व कौशल्य विकास मेळाव्यात ८० दिव्यांग उमेदवारांची विविध आस्थापनांमध्ये निवड झाली. या मेळाव्यास मेंदू विकारग्रस्त १४, मूक व कर्णबधीर ६९, अंध ३८, अस्थी व इतर व्यंग असणारे १७५ असे एकूण २९६ दिव्यांग उमेदवार उपस्थित राहिले. त्यामध्ये मुलींचे प्रमाण सुमारे ४० टक्के होते. यापैकी ८० उमेदवारांची विविध रोजगारांसाठी निवड झाली. यामध्ये डॉ. रेड्डीजमध्ये २८, एल.आय.सी.मध्ये ९, युरेका फोर्ब्जमध्ये ८, स्कायलार्कमध्ये १० तर शिवाजी विद्यापीठात २५ उमेदवारांची निवड झाली.

### विशेष वाहन व्यवस्था

विद्यापीठाच्या या रोजगार व कौशल्य विकास मेळाव्याला दिव्यांग विद्यार्थ्यांचा भर पावसातही लक्षणीय प्रतिसाद लाभला. सकाळी दहा वाजल्यापासूनच दिव्यांग विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांची मानव्यशास्त्र इमारतीमध्ये रीघ लागली होती. त्यांना इमारतीकडे आणण्यासाठी विशेष वाहन व्यवस्थाही विद्यापीठाने पुरविली. उमेदवारांच्या नोंदणीसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. नोंदणीकृत प्रत्येक उमेदवाराला मोफत चहा-नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली होती. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन विशेष रॅम्प उभारण्यापासून आवश्यक सुविधांची उभारणीही इमारतीमध्ये करण्यात आली. पायाने अधू विद्यार्थ्यांना व्हीलचेअरसह येता-जाता येईल, अशी व्यवस्था तळमजल्यावर करण्यात आली होती. त्यांच्या मुलाखतीची व कौशल्य प्रशिक्षणाची व्यवस्थाही तळमजल्यावरच करण्यात आली. इतर दिव्यांगांना पहिल्या मजल्यावरील सभागृहात कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले.

पुढारी

# परिस्थितीशी 'दोन हात' करणारी सुमैया

## ■ कॉम्प्युटर इंजिनिअर होण्याचे स्वप्न; मराठीची पदवीधारक

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

घरची परिस्थिती हलाखीची.. आई-वडील दोघांचा मेसमध्ये काम करून उदरनिर्वाह.. जन्मत: दोन हात नाहीत, अशा अवस्थेतही सुमैया युनुस पठाण हिने परिस्थितीशी दोन हात करीत कॉम्प्युटर इंजिनिअर होण्याचे स्वप्न बाळगले आहे.



> स्वत:च्या पायावर उभे राहून आई-वडिलांना मदत करणार आहे. कॉम्प्युटर इंजिनिअर होणार असून इतरांनाही मोठे होऊन मदत करणार आहे.
>
> **- सुमैया पठाण**

दिव्यांग विद्यार्थी, व्यक्ती म्हटले, की जाईल त्या ठिकाणी त्यांना त्रास सहन करावा लागतो. समाजासह इतर घटकांकडूनही वारंवार हेटाळणी केली जाते. दिव्यांग विद्यार्थी, उमेदवार नोकरी, रोजगारासाठी धडपडत आहेत. जन्मल्यापासून नशिबी संघर्ष असल्याची भावना ते व्यक्त करतात. शिवाजी विद्यापीठातर्फे शनिवारी महाराष्ट्रात पहिल्यांदाच दिव्यांगांसाठी रोजगार व कौशल्य मेळावा घेण्यात आला. मेळाव्यात ती कनिष्ठ लेखनिक पदाच्या मुलाखतीसाठी आली होती.

कदमवाडी येथे सुमैया पठाणचे आई-वडील राहतात. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आई-वडील दोघेही खासगी मेसमध्ये काम करतात. लहानपणापासून ती उचगाव येथील हेल्पर्स ऑफ हँडिकॅप्ड संस्थेत शिक्षण घेत आहे. महावीर महाविद्यालयातून मराठी विषयातून तिने पदवी संपादन केली आहे. पुढे पदव्युत्तर पदवी घेण्याची तिची इच्छा आहे. खासगी संस्थेत संगणक डाटा ऑपरेटर म्हणून ती काम करते. सर्व गोष्टी ती पायाने करते. पायाने लिहिताना तिचे अक्षरही तितकेच सुंदर आहे. परिस्थितीवर मात करीत मोठे होण्याची तिची धडपड वाखाणण्याजोगी आहे.

पुढारी

# रोजगार मेळाव्यात दिव्यांगांची रीघ

## भर पावसात उत्स्फूर्त प्रतिसाद; ३०० हून अधिक जणांचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात पहिल्यांदाच घेण्यात कौशल्य व रोजगार मेळाव्यास दिव्यांग विद्यार्थी, उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भरपावसात रोजगार मेळाव्यासाठी दिव्यांगांची दिव्यांग विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांची मानव्यशास्त्र इमारतीमध्ये रीघ लागली होती.

शिवाजी विद्यापीठ मध्यवर्ती रोजगार कक्ष, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व युजीसी- दिव्यांग व्यक्तींसाठी योजना यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च माध्यमिक, पदवी व पदव्युत्तर दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कौशल्य व रोजगार मेळावा शुक्रवारी झाला. मेळाव्याचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.





**कोल्हापूर : १) शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित दिव्यांग रोजगार व कौशल्य मेळाव्याचे उद्घाटन करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. महेश चव्हाण, डॉ. नमिता खोत, डॉ. जी. एस. राशिनकर, डॉ. विलास नांदवडेकर आदी. २) मेळाव्यासाठी आलेली दिव्यांग महिला उमेदवार. (छाया : नाज ट्रेनर)**

मेळाव्यात व्हिलचेअर २२, मूकबधिर ४६, अंध ४४, अस्थीव्यंग ४० अशा २९६ दिव्यांग उमेदवारांनी नोंदणी केली. सहा ठिकाणी दिव्यांगांच्या मुलाखतीची सोय करण्यात आली होती. दिवसभरात शिवाजी विद्यापीठासह युरेका फोर्ब्ज, स्कायलार्क ग्लोबल, डॉ. रेड्डीज फाऊंडेशन, एल.आय.सी. आणि स्टेट बँक ऑफ इंडिया आदी आस्थापनांनी रोजगार भरतीसाठी नोंदणीकृत उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. मेळाव्यात कोल्हापूर, सांगली, सातारा व रत्नागिरी जिल्ह्यांतील दहावी उत्तीर्ण ते इंजिनिअरिंगची पदवी असणारे विद्यार्थी सहभागी झाले होते. डॉ. ए. एम. गुरव, डॉ. के. व्ही. मारुलकर, डॉ. पी. एन. देवाळी, डॉ. जी. एस. राशिनकर, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. व्ही. एस. खंडागळे, प्रमोद कसबे, महेश चव्हाण, जयंत नागराळे यांनी मार्गदर्शन केले.

मेळाव्याचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जी. एस. राशिनकर यांनी स्वागत केले. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी आभार मानले. यावेळी युजीसी-स्कीम फॉर पर्सन विथ डिसॅबिलीटीज योजनेच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण आदी उपस्थित होते.

### ८० उमेदवारांची निवड

शिवाजी विद्यापीठातर्फे दिव्यांगांसाठी आयोजित रोजगार व कौशल्य विकास मेळाव्यात ८० दिव्यांग उमेदवारांची विविध आस्थापनांमध्ये निवड झाली आहे. मेळाव्यास मेंदू विकारग्रस्त १४, मूक व कर्णबधिर ६९, अंध ३८, अस्थी व इतर व्यंग असणारे १७५ असे २९६ दिव्यांग उमेदवार उपस्थित राहिले. त्यामध्ये मुलींचे प्रमाण ४० टक्के होते. यापैकी ८० उमेदवारांची विविध रोजगारांसाठी निवड झाली.

# विद्यापीठातील डॉ. आंबेडकर संशोधन केंद्रास प्रा. राजपूत यांची भेट

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** मध्य प्रदेशातील सागर येथील डॉ. हरिसिंग गौर विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख व प्रसिद्ध सम ाजशास्त्री प्रा. डॉ. दिवाकर सिंग राजपूत यांनी शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रास भेट दिली. केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी डॉ. राजपूत यांचे स्वागत केले. केंद्रातर्फे राबविण्यात येणाऱ्या समाजोपयोगी उपक्रम व प्रकल्पांची माहिती प्रा. महाजन यांनी दिली. व्यापक दृष्टिकोन ठेवून सुरू असलेल्या डॉ. आंबेडकर केंद्राच्या कार्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. प्रा. महाजन यांनी राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्नेहसंबंधाबद्दल माहिती दिल्यानंतर प्रा. राजपूत भारावून गेले. भविष्यात डॉ. हरिसिंग गौर विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ यांच्या परस्पर सहकार्यातून संशोधन व इतर उपक्रम आयोजित करता येतील, अशी आशा प्रा. राजपूत यांनी व्यक्त केली. यावेळी समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे उपस्थित होते.

# प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : दिव्यांग रोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाने समावेशी शिक्षण केंद्राच्या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राबवलेल्या उपक्रमांची देशपातळीवरील 'नॅब'सारख्या संघटनांनी दखल घेऊन विद्यापीठास पुरस्कार देऊन गौरविले आहे. दिव्यांगांप्रती ही बांधिलकी जपताना विद्यापीठाने त्यांच्यासाठी कौशल्य व रोजगार मेळावा आयोजित केला आहे. त्याला मिळालेला प्रतिसाद पाहता या पुढील काळातही विद्यापीठ अशा प्रकारचे उपक्रम दिव्यांगांसाठी राबवेल, अशी ग्वाही प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाचे मध्यवर्ती रोजगार कक्ष, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि यूजीसी- दिव्यांग व्यक्तींसाठी योजना यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च माध्यमिक, पदवी व पदव्युत्तर दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कौशल्य व रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्याचे उद्‌घाटन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. उद्‌घाटनानंतर नोंदणीकृत दिव्यांग उमेदवारांशी संवाद साधताना प्र-कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते. मेळाव्यासाठी सुमारे तीनशे दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली.

डॉ. शिर्के म्हणाले, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र रोजगार व कौशल्य मेळावा आयोजित करणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ असावे. दिव्यांग उमेदवारांना सन्मानाने रोजगार संधींची उपलब्धता, सर्वसमावेशकता आणि सबलीकरण या त्रिसूत्रीच्या आधारावर प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

मेळाव्याचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जी. एस. राशिनकर यांनी स्वागत केले, तर बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी आभार मानले. यावेळी यूजीसी-स्कीम फॉर पर्सन विथ डिसॅबिलिटीज योजनेच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण आदी उपस्थित होते. दरम्यान, सहभागींना मुलाखत तंत्र, छायाचित्रण, आयसीटी कौशल्ये, ग्रुप डिस्कशन, सकारात्मक विचार कौशल्ये, रिझ्युम लेखन, टॅक्स प्रॅक्टिस, सेट-नेट व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन अशा विविध कौशल्यांबाबत डॉ. ए. एम. गुरव, डॉ. के. व्ही. मारुलकर, डॉ. पी. एन. देवाळी, डॉ. जी. एस. राशिनकर, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. व्ही. एस. खंडागळे, प्रमोद कसबे, महेश चव्हाण आणि जयंत नागराळे यांनी मार्गदर्शन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित दिव्यांग रोजगार व कौशल्य मेळाव्याचे उद्‌घाटन करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जी. एस. राशिनकर, व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी, डॉ. ए. एम. गुरव, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.

## २९६ उमेदवारांची नोंदणी

मेळाव्यात मूकबधिर, अंध, अस्थिव्यंग अशा २९६ दिव्यांग उमेदवारांनी नोंदणी केली. दिवसभरात शिवाजी विद्यापीठासह युरेका फोर्ब्ज, स्कायलार्क ग्लोबल, डॉ. रेड्डीज फौंडेशन, एलआयसी आणि स्टेट बँक ऑफ इंडिया आदी आस्थापनांनी रोजगार भरतीसाठी नोंदणीकृत उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

## मेळाव्यात ८० दिव्यांगांना रोजगार

या मेळाव्यातून ८० दिव्यांग उमेदवारांची विविध आस्थापनांमध्ये निवड झाली. त्यामध्ये मेंदू विकारग्रस्त १४, मूक व कर्णबधिर ६९, अंध ३८, अस्थी व इतर व्यंग असणारे १७५ असे एकूण २९६ दिव्यांग उमेदवार उपस्थित राहिले. त्यामध्ये मुलींचे प्रमाण सुमारे ४० टक्के होते. यापैकी ८० उमेदवारांची विविध रोजगारासाठी निवड झाली. यामध्ये डॉ. रेड्डीजमध्ये २८, एलआयसीमध्ये ९, युरेका फोर्ब्जमध्ये ८, स्कायलार्कमध्ये १०, तर शिवाजी विद्यापीठात २५ उमेदवारांची निवड झाली.

# नव्या धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल

## – डॉ. व्ही. एन. शिंदे

**मुरगूड / प्रतिनिधी :**
राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ च्या मसुद्यात सध्या अस्तित्वात असलेल्या गोष्टींना छेद देत ५+३+३+४ या रचनेचा वापर करण्यात आला आहे .

या नव्या शिक्षण धोरणामुळे येत्या काही वर्षात भारतातील शिक्षण क्षेत्रात मोठ्या बदलाची शक्यता असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर आय.क्यू.ए.सी. व अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत क्लस्टरमधील महाविद्यालयांसाठी एकदिवसीय चर्चासत्र आयोजित केले होते. त्यावेळी शिंदे बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार होते. प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिवाजी होडगे यांनी केले. स्वागत अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. सुरेश दिवाण यांनी प्रमुख पाहुण्यांना पुष्पगुच्छ देऊन केले.




मुरगूड : मार्गदर्शन करताना डॉ. व्ही. एन. शिंदे, सोबत प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, उपप्राचार्य डॉ. शिवाजी होडगे व विनोदकुमार प्रधान.

प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार म्हणाले, चार वर्ष सलग बी.ए., बी.एड. च्या रचनेला प्राधान्य द्यावे, सर्वगुणसंपन्न शिक्षक भरतीसाठी कडक धोरण ठेवण्यात यावे.

यामध्ये प्रामुख्याने देवचंद महाविद्यालय अर्जुननगर, कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटी, पार्वतीबाई मोरे कन्या महाविद्यालय सरवडे, दूध-साखर महाविद्यालय बिद्री आणि सेनापती कापशी महाविद्यालय यांनी सक्रिय सहभाग घेतला. महाविद्यालयाचे नॅक समन्वयक उदय शिंदे, प्रा. सुरेश राजरत्न व अन्य मान्यवरांनी विविध प्रश्नांवर चर्चा केली. याप्रसंगी एल. पी. लंका, पी. डी. शिरगावे, ए. ए. रामटेके, माधवी पवार, अस्मिता प्रधान आदी उपस्थित होते.